(6)

ISSN 2348- 5825

International Registered &Recognized Research
Journal Related to Higher Education for all Subjects

# Indo Asian Philosopher

(UGC Approved,Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - VI, Issue - XII, Vol. - II | Impact Factor 5.60 (GRIFI) | Oct. 2018 To Mar. 2019



EDITOR IN CHIEF
Dr. Pramod G. Kalam

Scanned with OKEN Scanner

| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 15 | भारताच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचे योगदान<br>**डॉ. एन.पी. चिताडे, डी. डी. बिडवे** | 70 |
| 16 | महिला उदयोजकांच्या समस्या व उपाययोजना<br>**अर्चना अनिल विखे** | 73 |
| 17 | भारतातील बालकामगारांच्या सामाजिक - आर्थिक समस्यांचा एक आढावा<br>**डॉ.मिनाक्षी भास्कर जाधव** | 77 |
| 18 | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे योगदान<br>**डॉ. ए.एम. मोरे** | 81 |
| 19 | भारतातील नद्या जोड प्रकल्प : एक दृष्टीकोन<br>**सी. एस. शेळके** | 85 |
| 20 | भारतीय करप्रनाली आणि GST एक अभ्यास<br>**चेतना दत्तात्रय जगताप** | 90 |
| 21 | कृषी क्षेत्रात वीज क्षेत्राचे महत्व<br>**डॉ.महादेवी वैजनाथ फड** | 95 |
| 22 | उस्मानाबाद जिल्ह्यातील कुक्कुटपालन व्यवसायाचा चिकित्सक अभ्यास<br>**अमोल सिताराम शिंदे** | 98 |
| 23 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक समस्या<br>**अंकुश तु.करपे** | 105 |
| 24 | आर्थिक विकासाची उंच भरारी कृषी क्षेत्रावरच<br>**डॉ. शिवाजी भ.यादव** | 114 |
| 25 | महाराष्ट्रातील सद्यस्थितीतील कृषीउद्योग : समस्या आणि उपाययोजना<br>**डॉ. विशाल शिवाजीराव करपे** | 119 |
| 26 | असमानता संस्थापित मानव विकास निर्देशांक<br>**जे. बी. यादव** | 126 |
| 27 | भारतीय महिला आणि स्त्री मुक्ती चळवळ<br>**दिपक सुर्यवंशी** | 132 |
| 28 | अप्रत्यक्ष कर सुधारणा : वस्तू-सेवा कर<br>**डॉ. ज्ञानेश्वर जिगे** | 139 |
| 29 | महिला सबलीकरणाची वास्तविकता<br>**डॉ. संजय काशीनाथ मगर** | 143 |


Scanned with OKEN Scanner

IMPACT FACTOR 5.60

ISSN 2348-5825
Indo Asian Philosopher (IAP)
Issue : XII, Vol. II
Oct. 2018 To Mar. 2019
www.irasg.com

Research Paper 27 Economics

# भारतीय महिला आणि स्त्री मुक्ती चळवळ

दिपक सुर्यवंशी

**प्रस्तावना:-**

इ.स.१९७५ मध्ये युनो ने आंतरराष्ट्रीय महिला मुक्ती वर्ष म्हणुन साजरे करण्याच्या पार्श्वभुमीतुन पाश्चमात्य चळवळ निर्माण झाली पाश्चात्य महिला चळवळीचा पहिला टप्पा हा मतदानाचा हक्क बजावणे हा होता इग्लंड अमेरिका फ्रान्स या देशात कष्टकरी मध्यमवर्गीय स्त्रियांना मतदानाचा हक्क शिक्षण,संपत्ती समान कायदा इ.च्या मागणीतुन स्त्रीमुक्ती चळवळीला प्रारंभ झाला इ.स.१७८९ च्या फ्रेच राज्यक्रांतीतुन स्त्रीमुक्ती विचारांना निश्चित दिशा मिळाली,इ.स.१८३२ मध्ये इंग्लडमध्ये स्त्रियांच्य राजकीय हक्कांसाठी मेरी वुलस्टोन क्राफट या स्त्री प्रथम आवाज उढवला पुढे इ.स.१९११ मध्ये मिसेस पैकहस्ट च्य नेतृत्वाखाली मताधिकार चळवळीला स्वरुप प्राप्त झाले पुतिला सफ्रेजेट चळवळ म्हटले गेले इ.स.१९१८ मध्ये लोकप्रिति निधित्वाच्या कायद्याने तीस वर्षा पुढील वयाच्या स्त्रियांना मताधिकार दिला इ.स.१९२८ मध्ये एकवीस वर्षावरील स्त्रीयांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला.

या आगोदर इ.स.१६७४ पासुन अमेरिकेमध्ये असाहत काळात अविवाहीत स्त्रीला कायदेशीर मताधिकार होता पुढे विवाहबंध्द झाल्या नंतर तिचे स्वतंत्र्य कायद्याने सपुष्टांत येई याच झाली मार्गारेट ब्रेटन या स्त्रीने मेरीलँड विधान सभेत स्त्रियांना मदतानाच्या हक्काची मागणी केली इ.स.१७८० ला संपत्तीची मालकीचा हक्क मिळाला,फ्रोन्सेस राईट,बेकरपंथीय लुक्रेशिया मॉट,सुसान ॲथोनी, एलिझावेथ,कँगी स्टॅन्टन मार्था राईट,मेरी ॲन,मॅकलिन्टॉक,या लढाऊ वृत्तीच्या स्त्रियांनी अमेरिकेतील इतर स्त्रियांना अधिकार प्राप्त करुन दिले इ. १८३९ मध्ये मिसिसिपीया घटकराज्यातील स्त्रीला मतदानाचा आधिकार मिळाला इ.स.१८४८ मध्ये न्युर्यादुमधील स्त्रियांनी सितेका फॉल्स येथे जगाच्या इतिहासातील पहिले परिष्ज्ञद भरवली येथेच स्त्री स्वातंत्र्याचा जाहिरनामा प्रसिध्द केला इ.स.१८६९ मध्ये आद्योगिक क्षेत्रातील मागण्यासाठी अंदोलन केले,इ.स.१९१० मध्ये केपेनहेमेन येथे अंतरराष्ट्रीय महिला



Scanned with OKEN Scanner

परिषद भरवली, येथेच ८ मार्च हा दिवस महिला दिन म्हणुन ठरवण्यात आला इ.स.१९१९ जुनला स्त्रियाना सर्व राज्यामध्ये मताधिकार प्राप्त झाला फ्रान्समध्ये कॅथॉलिक चर्चने स्त्रियावर धर्माच्या नावाखाली दुय्य लाडले होते १० व्या ११ व्या शतकास स्त्री ही सर्वात तिरस्करणीय १३ व्या शतकात तिला चेतकिन म्हणुन छळले गेले या पार्श्वभुमीतुन ख्रिस्तीन दपिसॉ यांनी Eistle to the God of love या ग्रंथातुन स्त्रियांची बाजु मांडली३इ.स.१४४२ मध्ये मार्टिनली फ्रॉक या खेळाडु स्त्रीने इ.स.१५५२ मध्ये लुईस लॅबे या कवीयत्रीने १५५९ मध्ये मार्गारेट द-नॉवारे या लेखिकेने Heptametion या ग्रंथातुन स्त्रीचे दुख मांडले मेरी द.गौर्णी १९६० मध्ये हिने स्त्रिला माणूस म्हणुन स्थान मिळाले अशी मागणी केली इ.स.१६५० मध्ये Preciosite Movement चळवळीने वेग घेतला मोलियर व रुसो या विचारवंतानी या चळवळीची खिस्ती उडवुन पारंपरिक मानसिकता द्रठ केली इ.स.१७८९ मध्ये फ्रान्समध्ये सनदशीर राज पध्दती सुरु झाल्यानंतर इ.स.१७९१ मध्ये ऑलिम्प-द-गॉनेसा या स्त्रीने नॅशलन असेंबली पुढे मागण्याचे निवेदन सादर करुन स्त्रीला समान दर्जा मिळावा अशी मागणी केली इ.स.१७९३ मध्ये Having forgotten the virtues of which belong to her six ह्या गुन्हयासाठी गॉजेसला मृत्युदंड देण्यात आला जेनी दर्शन पॉली रोकँड सुसान व्हल्ल क्वीन इ.नी तुरुंगवास हद्दवारी सहन करुन कार्य केले इ.स.१८१८ मध्ये मारीया वेदाम्स हिने फ्रान्समध्ये स्त्रियांच्य हक्कासाठी इंटरनॅशनल कॉग्रसात्व प्रारंभ केला इ.स.१९४४ मध्ये अथक परिश्रमानंतर फ्रान्समधील स्त्रियांना मतदानाचा आधिकार प्राप्त झाला इ.चळवळीमुळे द्वारे पाश्चात्य स्त्रीला स्वताचे आस्तित्व,अस्मिता इ.विषयी आत्मभान आले या जाणिवतुन संपूर्ण जगभर स्त्री मुक्ती चळवळ पसरली गेली. पारतंत्र्याच्या काळात भारताला स्वातंत्र्य मिळवुन देण्यासाठी असंख्य स्त्रियांनी पुरुषांच्या खादयाला सादा देऊन इंग्रजांच्या लढ्यात उड्या घेतल्या.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील महिला मुक्ती चळवळ -**

इ.स.१९२० ते १९४७ हा गांधी युगाचा कालखंड हा स्त्री सुधारणा आणि महिलांच्या प्रश्नाकडे विशेष लक्ष देणार आणि महिला चळवळ रुजवणारा कालखंड होता या गांधीनी स्वातंत्र्याच्या संग्रमात महिला उपयोग मनुष्यबळ म्हणुन केला होता त्या निमित्याने चार भिंतीमध्ये डांबलेली स्त्री उंबरठ्यासमोर पडली इ.स.२७ नोव्हे.१९१८ मध्ये मुंबई येथे मा.गाधींच्या पहिल्या शिष्या अवंतिकाबाई,गोखले यांनी महाराष्ट्रीयन स्त्रीने हिंदु महिला सभा स्थापन करुण हिंदु महिला साप्ताहिक स्थापन केले याच पार्श्वभुमीतुन सविनय कायदे भंग चळवळीमध्ये असंख्या स्त्रिया लक्षणिक सहभाग नोंदवला,तुफान दत्त संघटना वंग महिला समाज महिला थिऑसॅकिल सोसायटी भारत महिला परिषद १९४९ भारत स्त्री महामंडळ १९१० महिला भारतीय १९१७ भारतीय महिला राष्ट्रीय परिषद १९२५ अखिल भारतीय राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट इ.संघटनामध्ये महिलांचा स्त्रियांच्या उत्थानासाठी सामाजिक प्रथामध्ये सुधारणा करुन स्त्रीला रचनात्मक भुमिकेसाठी सक्षम बनवणे,आणि महिलांना पुरुषांच्या बरोबरीने आधिकार देणे या उद्देशाने भारतीय महिली लक्षणीय व सक्रिय भाग नोंदवला तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्पृश्यताविरोधी लक्ष्यातली हजारो दलित स्त्रियांचा सहभाग होता सुभाषचंद्र बॉस याच्या राष्ट्रीय लष्करातील कॅप्टन लक्ष्मी यांच्या नेतृत्वाखाली महिलांची फलटन उभारली गेली आदिवासी व वेठणारी स्त्रीयामध्ये जाग्रती घडवण्याचे कार्य गोदावरी परुळेकर यांनी केले तर इ.स.१९२१ च्या गिरण्याच्या सार्वजनिक संपले नेतृत्व उषाताई डांगे यांनी केले एकंदरीत पाश्चात्याचा प्रभाव मा.गांधीजीचे विचार आणि प्रेरणा,स्वातंत्र्य लक्ष इ.मुळे भारतातील



Scanned with OKEN Scanner

महिला चळवळ स्वतंत्र्यपूर्व काळात फोफावली गेली व स्वातंयोत्तर काळातील भारतीय महिला चळवळ मनुस्पृतीतुन निर्माण झालेली कौटुविक दुय्यमत्वाची जाणिवेतुन महाराष्ट्रामध्ये इ.स.१९६७ मध्ये महिला मुक्ती चळवळीच्य विचाराचे अंदोलनाला प्रारंभ झाला इ.स.१९७९ ला अखिल भारतीय महिला जागृती परिषदेचे आयोजन करण्यात आली इ.स.१९७९ ला महाराष्ट्र पुणे येथे पहिली स्त्री मुक्ती परिषद आयोजिक करण्यात आली इ.स.१९६७. ते १९८५ या काळात महाराष्ट्रामध्ये ठिकठिकाणी स्त्रियांच्य प्रश्नांवर कार्यकर्मे झाली इ.स.१९७९ मध्ये महाराष्ट्रामध्ये स्त्रीमुक्ती अंदोलन संपर्क समिती स्थापण्यात आली,यामध्ये एकूण बेचाळीस संघटनाचा सहभाग होता ग्रामीण शहरी कामगार,कष्ट करी अशा विविध क्षेत्रातील स्त्रियांचा सहभाग होता यामध्ये उदार मतवादी जहाल स्त्रीमुक्तीवादी स्त्री पुरुष वर्ष समानता, स्वातंत्र्य, समाजवादी स्त्रीमुक्ती मार्क्सवादी स्त्रीमुक्ती इ.प्रवाह निर्माण झाले एकंदरीत भारतीय स्त्रीमुक्ती चळवळ स्त्री पुरुष समानता,नक्षलवाद,महागाई,गुजरात,विहारमधील नवनिर्माण अंदोलन,तर प्रदेशातील चिपके अंदोलन सारख्या स्त्री प्रश्नावर भारतातील स्त्रिया संघटीत झाला इ.स.१९७५ नंतर या संघटना गतिमान झाल्या,राष्ट्रीय महिला समिती स्थापन झाली पुढे मनुष्यवळ विकास मंत्रालयाने महिला व बालविकास हा विभाग सुरु करुन शासन रुरवीर महिलांचे प्रश्न आरोग्य,शिक्षण क्षेत्रातील हक्क आणि लौकिक विषमता राजकीय हक्क इ.प्रश्नावर भारतातील स्त्री एकत्र संघटित येऊ लागल्या प्रश्नाची समस्याची सोडवणुक करुन घेऊ लागल्या महिला चळवळ आणि शासनाचे धोरण,कायदे स्त्रियांच्या बाजुने असल्यामुळे स्त्रीच्या आवस्थेत सकारात्मक बदल होत गेले.

सारांश भारतीय महिलांचा विकास होण्यामागे भारतातील ब्रिटीशाच प्रशासन सोयी-सुविधा,कायदे शिक्षण विषय धोरण,नव सुधारणा आणि पाश्चात्य महिला चळवळ इ.बाबी महत्वाच्या ठरल्या पाश्चात्य महिला चळवळीच्या प्रभावातुन भारतीय महिला चळवळ उभी राहण्यास मदत झाली.

इ.स.१९६० नंतर स्त्रियांचे शिक्षण इतर सुविधा मिळाल्यामुळे पुरुष आपणास शोभेचे बाहुली वस्तु प्रमाणे वापरत आहे याची जाणीव झाली पुढे इ.स.१९६३ मध्ये The freminine mystique या ग्रंथाचे स्त्रियांना विचार प्रवण बनवले विशेषता या काळात पाश्चामात्य देशामध्ये स्त्री हक्क आणि स्त्रीमुक्ती या विषय आधिक विचार मंथन सुरु झाले इ.स.१९७०-८० च्या दरम्यान महिला चळवळीने इंग्लंड अमेरिका,इ.देशात साहित्य प्रकाशन संस्था,विद्यापीठीय अभ्यास क्रम,चर्चासत्र इ.माध्यमातुन विचार मंथनातुन स्त्रीवाद अध्ययन व संशोधनाचे स्वतंत्र शैक्षणिक क्षेत्र म्हणुन स्थान प्राप्त झाले इ.स.१९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्षे म्हणुन युनोने जाहिर केले परिणामी स्त्री मुक्तीचे अंदोलन आधिक प्रवाही व गतीमान झाले या प्रभाव परिणामातुन भारतातील महिला चळवळ गतिमान झाली पुढे तिचे संरक्ष्णासाठी विवाह,संपत्ती रोजगार शिक्षण,विवाहाचे वय पुनर्विवाह,बालविवाह प्रतिबंध १८२९ विशेष विवाह अधिनियम १९३९ -१९५५ हिंदु वारसा कायदा १९२९ हिंदु स्त्री संपत्ती विषयक कायदा हिंदु वारसा १९५६ रोजगारविषय कर १९४८ कर्मचारी राज्य विमा कायदा,प्रसुती लाभ,१९४८ तसेच कामाची वेळ,समान वेतन,वजन वाहुन नेल्या जाणा-या ओझ्याचे प्रमाण,सर्फाट सुविधा,शिशुगृहे,व इतर वावी विषयी कायदे,निर्माण झाले या कायद्यामुळे स्त्रीच्या सामाजिक स्थिती मध्ये परिवर्तन होण्यास बराच हातभार लागला,परंतु परिवर्तनाची गती मंद होती भारतामध्ये पारतंत्र्यापासुन आजपर्यंत कर्म स्त्रियांची परंपरा अबाधित राहिली,पारतंत्र्य काळात सरोजिनी नामडु कस्तुरबा गांधी,सुचेला कृपाला करावसाय भांगला तर स्वातंत्र्यात्तर इंदिरा गांधी

Scanned with OKEN Scanner

पंतप्रधान विजया लक्ष्मी पंडित,(UNO) भारताचे प्रतिनिधी सोनिया गांधी,सुषमा स्वराज इ.अभिजान वर्गातील स्त्रीया उल्लेख करता येतो.

**I. स्त्रीवादाची पायाभरणी -**

स्त्रीवाद ही एक राजकीय चळवळ आहे जगाच्या इतिहासात आजपर्यंत पुरुषांचा वरचष्मा राहिला आहे स्त्रीवर होणारा अन्याय,अत्याचार,तिला माणूस म्हणून हक्क मिळवुन देण्यासाठी केलेला प्रयत्न म्हणजे `स्त्रीवाद` होय.जगामध्ये गेल्या तीस-चाळीस वर्षापासुन म्हणजे इ.स.१९७५ मध्ये जागतिक स्त्री मुक्ती चळवळीचे वर्षे साजरे केले, तेव्हा पासुन जगामध्ये स्त्रियांकडे सहानुभूतीने पाहण्याचा दृष्ट्रीकोण निर्माण झाला तेव्हापासुनच स्त्रीवादी भुमिकेचा राजकीय सामाजिक,सांस्कृतिक,शैक्षणिक,वाङ्मयीन इ.क्षेत्रात प्रभाव वाढला स्त्रीवादी चळवळ निर्माण होण्याआगोदर त्याची पायाभरणी लोकशाहीचा पुरस्कर्ता असलेल्या इंग्लड देशामध्ये झाली. औद्योगिक क्रांतीनंतर कारखान्यात काम करणा-या स्त्रीयांचे होणारे शारीरीक मानसिक शोषण आणि याच काळात म्हणजे १८५६ मध्ये दारुविक्याचा कोर्टातील खटल्या प्रकरणा नंतर स्त्रीयावर होणा-या अन्याय,अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी चळवळ निर्माण झाली याच चळवळीला चालना देण्यासाठी इग्लड मध्ये इ.स.१९७६ मिसेल `वुडलस्टन क्राप्ट` यांनी `व्हिडिकेशन ऑफ वुमन`आणि जॉन स्टुअर्ट यांनी सबजेक्शन ऑफ वुमन`चा दोन लेखिकेचे स्त्री-स्वातंत्र्य आणि अन्याय,आत्याचारच्या विरोधात ग्रंथ प्रसिध्द झाले यास सुमारास राज्य क्रांतीचा प्रणता असलेल्या फ्रांन्स देशाची राजधानी पॅरीस मध्ये हेलन सिक्सस`यांचा `दिलॉक ऑफ मेडुस`हा ग्रंथ अत्यंत प्रसिध्द झाला, जगामध्ये स्त्रीवादी चळवळीची प्रसिध्दी मोठ्या प्रमाणात व्हायला लागली,यापुढे स्त्रीवादी चळवळीने मुळे धरली.

इंग्लडमध्ये नव्या विचारांची चालू असलेल्या `सफ्रेजेट`चळवळीतुन स्त्री स्वातंत्र्याचा विचार भारतामध्ये आला पुढे जॉन स्टुअर्ट मिलच्या Sujection of women`या पुस्तकाच्या भाषात्तंराने मुंबई मार्गाने महाराष्ट्रात आला.

**II. भारतात स्त्रीवादाची सुरुवात -**

इ.स. १९७५ मध्ये जागतिक स्त्रीवाद चळवळीचे वर्षे साजरे करण्यात आले त्या वर्षापासुन सविनयपणे भारतामध्ये स्त्रीवाद आला असला तरी त्या आगोदर भारतामध्ये स्त्रीवादाची पार्श्वभुमी लाभलेली आहे स्त्रीवादाचा प्राचीन काळामध्ये विचार करावयाचा झाला आर्याच्या आगमनाबरोबर स्त्रीवादी विचाराची मुळे रुजली आर्यानी आपल्या संस्कृती मध्ये स्त्रीला लक्ष्मीचे स्थान दिले पुढे हिच परंपरा भारतीय संस्कृतीने हस्तातरीत केली `स्त्रीला`प्रतिष्ठा धार्मिक दृष्ट्रीने प्राप्त झाली परंतु पुढे मनुस्मतीमध्ये स्त्री ही गुलाम वनवली पुरुष प्रधान संस्कृती मध्ये दासत्व,व उपभोग्य वस्तु म्हणून पाहिले गेले.

भारतातील ख-या स्त्रीवादाला सुरुवात झाली ती १८ व्या शतकाच्या संक्रमणाच्या,अव्वल इंग्रजी राजवटीच्या काळामध्ये कारण इंग्रजाने सुरु केलेल्या नवविचार व नवमुल्य शिक्षण प्रणाली द्वारे नवशिक्षण घेतलेल्या सुधारणावादी विचारसरणीतील प्रारंभीच्या अभ्यासकांनी स्त्रीयांवर होणा-या अन्याय आत्याचार व दास्यत्वाच्या प्रथेवर हल्ला चढवला यामध्ये सुधारणावादी सुधारक,आगरकर,धो.के कर्वे,न्या.रानडे मा.फुले इ.समाजसुधारकाच्या कार्यातुन महाराष्ट्रामध्ये स्त्रीवादी विचारणीची बिजे पेरली गेली स्त्रीवादाला प्रारंभ झाला.



Scanned with OKEN Scanner

**III. पाश्चात्य स्त्रीवाद आणि भारतीय स्त्रीवाद -**

भारतीय स्त्रीवाद पुरुष प्रधान संस्कृतीतुन मनुस्मृतीद्वारे जुलमी रुढी,आणि अघोरी परंपरेच्या विरोधातुन पुढे आला याउलट पाश्चात्य स्त्रीवाद ही औद्योगिक कारणातुंन पुढे आला.हा दोन्ही स्त्रीवादातील महत्वाचा फरक जाणवतो पाश्चात्य स्त्रीयांना देशात कारखान्यामध्ये कामगार म्हणुन दिवसाचे बारा चौदा तास काम करवुन घेतले जात होते आणि त्याच्या कामाचा मोबदला ही अगदी नागण्य असे तसेच प्रसंगी मुकदम अथवा कामगार प्रमुख कारखानदार इ.कडुन शारिरिक शोषणास बळी पडावे लागत असे या शारीरीक आणि मानसिक आर्थिक शोषणातुन पाश्चात्य स्त्रीवादाचा जन्म झाला तर भारतीय स्त्रीवाद हा जुन्य पुरसटलेल्या रुढ प्रथा,परंपरेच विरोधातुन पुढे आला भारतीय समाजामध्ये एवढा प्रखर स्त्रीवाद दिसुन येत नाही कारण पारतंत्र्याच्या काळात भारताला स्वातंत्र्य मिळवुन देण्यासाठी असंख्य स्त्रीयांनी पुरुषाच्या खाद्याला खादा देऊन इंग्रजांच्या लढ्यात उड्या घेतल्या,तेव्हा या स्वातंत्र्य संग्रमात पुरुषांनी स्त्रीयांना समान दर्जा प्राप्त होता,पाश्चात्य स्त्रीयाच्या अन्याय अत्याचारापेक्षा भारतातील स्त्रीवाद याकडे पाहण्याचा दृष्ट्रीकोन मानवी पातळीवरचा होता पाश्चात्य आणि भारतीय स्त्रीवादातील ही तफावत आपणास दिसून येते.

**VI. स्त्रीवादी दृष्ट्रीकोण -**

पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीयांना दास्यत्व बनवले होते, स्त्रीला फक्त उपभोग्य वस्तू सौंदर्य कल्पना, अंगवस्त्र इ.संकल्पनेने बांधलेले होते इ.स.१९०५ नंतर मात्र स्त्रियाकडे पाहण्याचा मानवीय दृष्ट्रीकोन निर्माण व्हावा तिचे दुय्यम स्थान किंवा उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्याचा भारतीय दृष्ट्रीकोण बदलावा, यादृष्ट्रीने सनदशील मार्गाने किंवा राजकीय मार्गाने आपल्या मागण्या मान्य करुन समतेसाठी,हक्कासाठी,संघर्ष करणारी चळवळ म्हणजे `स्त्रीवादी चळवळ` होय.

महाराष्ट्रामध्ये स्त्री ही सर्व हक्क आणि आधिकाराने बाधुन ठेवली होती,मनुवाद्यानी तिला चूल आणि मूल तसेच घराच्या दुर्भाग्य आंधा-या कोठडीत कित्येक वर्षे स्त्रीयांना सहानुभुतीने कुचवले होते इ.स.१९७५ वर्षे उजाडले आणि जगभर स्त्रीयाकडे पाहण्याचा दृष्ट्रीकोण निर्माण झाला आंतरराष्ट्रीय पातळीवर स्त्री याच्या प्रश्नांना,समस्यांना वाचा फोडण्याचे कार्य करण्याचा प्रवाह निर्माण झाला निसर्गाने स्त्रीयांना प्रजनन करण्याची शक्ती दिल्याने प्रजनन काळात व इतर वेळेत तिच्यावर होणारे शारिरीक शोषण,खच्चीकरण इ.ला वाचा फोडण्यासाठी किंवा हे होणारे खच्चीकरण भरुन काढण्यासाठी स्त्रीवादी चळवळ जन्माला आली गरोदरपण,मासिक पाळी,नौकरी शिक्षण संरक्षण,इ.संदर्भातील लढे उभे करुन महाराष्ट्रातील पुरुषी संस्कृतीला स्त्रीवादी चळवळीने हदरे दिले.

**V. स्त्रीवादी साहित्याची भुमिका -**

स्त्रीयाचे प्रश्न, समस्या केंद्रस्थानी ठेवून स्त्रीयावर अन्याय करणा-या प्रवृत्तीना जाब विचारणे आणि आपले हक्क, आधिकार, स्वातंत्र्य मिळवणे हा स्त्रीवादी साहित्याचा अंतिम उद्देश आहे पुरुषांनी साहित्य लिहिण्याऐवजी स्त्री लेखिकेने अनुभवातुन नव्या पुरोगामी विचारसरणीतुन लेखन करणे ही प्रमुख भुमिका स्त्रीवादी साहित्याचे होती पुरुष प्रधान संस्कृती मध्ये स्त्रीशिक्षण,रोजगार, घर संसार,इ.क्षेत्रात पुरुषा बरोबर समान दर्जाने वाढविले जावे,ही प्रमुख भुमिका होती याविषयी व्हजिनिया वुल्फ म्हणतात तुम्ही लिहा तुमच्या देहाचा आवाज इंग्रजाना ऐकू गेला पाहिजे, तरच तुमच्या अबोध मनाचा प्रचंड खजिना



Scanned with OKEN Scanner

खुला होऊन सर्वांना दिपवून टाकेल"

## VI. स्त्रीवाद आणि साहित्य -

मराठी स्त्रीयांनी आपले हक्क अधिकार मिळवण्यासाठी केलेली चळवळ म्हणजे स्त्रीवादी चळवळ होय स्त्रीयांनी आपल्या हक्कासाठी, पुरुषप्रधान संस्कृतीला व व्यावस्थेविरुध्द राजकीय भुमिकात घेता केले लेखन म्हणजे स्त्रीवादी लेखन होय,जगामध्ये फान्सच्या हेलन सिस्कस च्या सब्जेक्ट ऑफ वुमनचा ग्रंथाच्या लेखनातुन स्त्रीवादी लेखनाला प्रारंभ झाला महाराष्ट्रामध्ये स्त्रीवादी लेखनाचा विचार करावयाचा झाला तर १८ व्या शतकाच्या पुर्वाधात समाजसधारकांनी समाज सुधारणा आणि समाजातील वाईट प्रथा,रुढी इ.नष्ट करण्याच्या दृष्ट्रीने कार्य बरोबर अनिष्ठ लेखन केले तेव्हा महाराष्ट्रामध्ये स्त्रीवादी लेखनाला प्ररंभ झाला यामध्ये कर्वे, आगरकर,न्या.रानडे,फुले इ.समाज सेवकांनी स्त्रीवादी लेखनाला प्रारंभ केला परंतु त्या लेखनाला अस्सल स्त्रीवादी लेखन म्हणून स्त्रीवादाने स्वत:च्या भुमिकेतुन स्त्री लेखिकेने लिहिले ते स्त्रीवादी साहित्य लेखन केले ते इ.स.१९६० नंतरच,ग्रामीण,दलित,आदिवासी,इ.साहित्या बरोबरच स्त्रीवादी साहित्याने आपले दालन समृध्द केले इ.स.१९६० पुर्वी अनेक लेखकांनी स्त्रीयांचे प्रश्न,समस्या घेऊन लेखन केले ते स्त्रीवादी साहित्य म्हणुन त्याला पुर्णागाने मान्यता प्राप्त नव्हती,कारण ते लेखन अतिरंजित काल्पनिक, पुरुषांनी सहानुभूतीने केलेले लेखन होते.

इ.स.१९६० नंतर पुरुषांनी स्त्रीयाकडे सहानुभूती पूर्ण पाहण्याच्या व काल्पनिक दृष्ट्रीकोनाला छेद देऊन स्वानुभव,स्वताला झालेले दुं:ख वेदना,घेऊन स्त्रीयांचे प्रश्न,समस्या,घेऊन स्त्रीवादी साहित्य जन्माला येऊ लागले यामध्ये ताराबाई शिंदे विद्यावाळ,रझिया पटेल,तारा परांजपे,उर्मीला पवार,संध्या रंगारी उषाकिरण आत्राम जनाबाई गि-हे छाया कोरेगावकर,माल्लिका अमर शेख,ज्योति म्हापसेकर इ.असंख्य स्त्रीलेखिकेने धर्मनिरपेक्ष दृष्ट्रीकोनातुन महिलची होणारी कुचबनेला वाट मोकळी करुन दिली हा स्त्रीवाद केवळ सुशिक्षित उच्च वर्गीय,स्त्रीयापुरताच मर्यादीत न राहता ग्रामीण दलित,अज्ञानी,शेतमजुर,मजुर सर्व क्षेत्रातील महिलांच्या समस्याला कवेत होणारा आहे.

**समारोप -**

आजच्या काळात ही थोड्या फार प्रमाणात महिलांना असलेल्या उच्च वर्गातील इतर सामान्य स्त्रियांना परिस्थितीत बदल घडवुन आणण्यासाठी संर्घष करावा लागला शेतमजूर शहरी कामगार महिला घरसंसार उदरनिर्वाहासाठी सतत परिश्रम करते,मध्यमवर्गीय महिला गृहिणी अथवा मिळवली तिचे जीवन कोंडलेले घुसमटलेले भारतातील बंडु संख्या महिलांचे कर्तबगारीचे बिजे करपुण जातात त्यांनी विकासाची संधी मिळवत नाही,विकासापासुन दुर आहे.

२१ व्या शतकात भारताने जागतिकीकरणाचे,उदारी करमाचे स्वीकारलेल्या धोरणात,खुल्या बाजारपेठेत भारत देश परदेशी कंवण्याच्या विळख्यात आडकला आहे सामान्य माणूस निराधार होत आहे नवश्रीमंत रेव्ह पार्थि वर्ग पुढे येत आहे अशा नव श्रीमंताचा श्रम परिहारासाठी पंब सारखी संस्कृती जन्माला येत आहे येथे स्त्रीही उपभोग्य,वस्तु म्हणुन पाहिल जात आहे एका बाजूला अतिरिक्त पैसा व सेवा त्यांनी पोसलेले गुंड, आणि गरिबी मुळ असध्य झाल्या स्त्रिया या मुळे समाजात स्त्रियांच्या बाबतीत गुंडगिरीचे,अत्याचाराचे प्रमाण वाढले महाविद्यालयीन तरुणीची छेडछाड, फसवे प्रेम प्रकरण, एकतर्फी प्रेम प्रकरणातुन मुलीची होणारी जाळपोळ,यामुळे स्त्री शिक्षण धोक्यात येत आहे तसेच नौकरी करणा-या



Scanned with OKEN Scanner

महिला संबंधी लौकिक शोषन,अत्याचार,इ.स्त्री संबंधी वाढती गुन्हेगारी,निर्भया,सारखे प्रकरणे इ.मुळे समाजात मुंबई, दिल्ली, पुणे इ. महानगरात स्त्रियांची सुरक्षिते संबंधी प्रश्न निर्माण झाला आहे दिवसेंदिवस स्त्रियासंबंधी गुन्हे अत्याचार मोठ्या प्रमाणात वाढत चालले आहे कुंदनखाने वाढते आहे एकंदरीत स्त्रीयांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभिर होत आहे.

आजची स्त्री देखील याला काही अंशी जबाबदार आणि गुन्हेगार आहे पैशा मिळवण्यासाठी अथवा हिराईन बनण्यासाठी इ.अतिमहत्वकाक्षाच्या मागे धावते आहे,निरनिराळ्या ठिकाणी वेशा व्यावसाय करते आहे चित्रपटाचे अनुकरण,पुरुषाशी नको तितके मोकळेपणा,चैनीची चटक इ.साठी सारी नीतीमुल्य धान्यावर बवविले जात आहेत तसेच मध्यवर्गीय समाजातील विचारवंत म्हणविणारी स्त्रीसुध्दा विवाहाशिवाय कुणा बरोबर राहते,अवैध मातृत्व समलिंगी संभोग यांच्याविरुध्द बोलत नाही आपद धर्म म्हणुन नव्हे तर सर्रास पाठिंबा देते,विवाह सारखा घटस्फोट देखिल नैसर्गिक समजते अशा स्त्रियांची संख्या आजच्या युगात वाढत आहे एकंदरीत चंगळवादाच्या नावाखाली स्त्रिला शोभेची वस्तु व उभभोग्य वस्तु म्हणुन पाहिले जात आहे स्त्रियांही या चंगळवादामध्ये डुंबुन जात आहे भारतीय समाजाची नीतीमुल्य ढसळत आहेत,अशा परिस्थितीत वंचित महिलाचा विकास घडवुन आणले आणि ढासळणारी नैतिक मुल्याची प्रतिष्ठापना करणे आजच्या काळात मोठे आव्हान आहे.

## संदर्भ सूची :-


१. डॉ. प्रतिभा अहिरे- समाजशास्त्रीय परिक्षेत्रातुन स्त्रियांची आत्मकथने कैलाम, पब्लीकेशन,औरंगाबाद.

२. डॉ.तारा परांजपे - अदिम प्रतिभा आणि जीवन रजत प्रकाशन औरंगाबाद

३. शंकर सारडा - स्त्रीवादी कादंबरी,राजश्री प्रकाशन,पुणे

४. ताराबाई शिंदे - स्त्री - पुरुष तुलना

५. प्रतिभा इंगोले - लोकसंस्कृती आणि स्त्री जीवन,दिलीपराज प्रकाशन पुणे,२००३

६. साळुंके आ.ह - हिंदु संस्कृती आणि स्त्री,लोकवाङ्मय गृह मुंबई १९८९

७. डॉ.शैल लोहिया - भुमी आणि स्त्री




Scanned with OKEN Scanner